# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. सुरेखा जबडे

---

संगीत ही आनंददायी देणगी आहे
संगीतामध्ये सप्तसूर पाहे
संगीत अनेक अलंकारांनी परिपूर्ण भासे
संगीतामध्ये अनेक मने डोलत राहे
आजारी सुद्धा संगीताने बरा होई
संगीत साथीला असेल आनंद परिसिमा गाठे
संगीताच्या सप्तसुरांनी सात रंग मनात साठे
संगीत नसेल तर कार्यक्रम उदास वाटे
संगीताने नवचैतन्य चेहऱ्यावर उठे
संगीत कुठलेही असू द्या मनाला ती पहाट वाटे
संगीताची बाज असणाऱ्यांना साज चढवण्याची गरज नसे
संगीतातल्या सौंदर्याने इतर सौंदर्याची गरज न भासे
संगीत जर जसे खुलत जाईन तसा मनुष्य डोलताना दिसे
एखादा संगीतकार पाहून गेला मन चर्र होत असे
आपण संगीतकार गमावला मन दुखी होते
संगीत हे वातावरण निर्मिती करीत असते
कुठला कार्यक्रम करण्याची संगीता शिवाय शोभा नसते
संगीताच्या कार्यक्रमाला जनसमुदायाची गर्दी उडते
ज्याला संगीत समजते त्याचे मन संगीतात रमून जाते
संगीता अतिशय सुंदर आहे हे ज्याला समजते
संगीता शिवाय जीवन बेसूर होईल हे लक्षात येते
संगीताच्या या वेली वरती आपण अलगद चढतो
प्रत्येक रंगाचा आनंद घेऊन संगीता आपण फुलवितो

Arhant Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

संगीताची प्रत्येक पायरी चढताना आपला आत्मविश्वास वाढत राहतो
संगीताचा किती गोडवा गाऊ जितका गाऊ तितकी रुची वाढवतो
सतारीच्या तारे वरती तो आपली बोटे फिरवीत राहतो
फिरणाऱ्या या बोटांनाही तो धुंद करतो
धुंद होणाऱ्या बोटांनी चेहऱ्यावरची लालीमा वाढवितो
समोरचा मात्र बघत राहतो आपण मात्र डुलत राहतो
संगीताच्या या आनंदामध्ये दुसरा आनंद कशात नसतो
संगीताने मने आकर्षित होऊन मनुष्य नवीन नाते जोडतो
संगीत आनंदाचा असो अगर दुःखाचा तो माहोल तयार करतो
अशा या संगीताला मी मानाचा मुजरा करतो मानाचा मुजरा करतो

Anahat Music Therapy